25-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/24/2025 11:30 PM Page 1



# न्यूझीलंडकडून बांगलादेशचा पराभव

## पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीतून बाहेर | न्यूझीलंडच्या बांगलादेशवरील विजयाने शिक्कामोर्तब : भारत-न्यूझीलंड सेमी फायनलमध्ये

दुबई, दि. २४ : चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद असलेल्या पाकिस्तानचा संघ स्पर्धेच्या अवघ्या दिवसांतच स्पर्धेतून बाहेर झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीतील सहावा सामना न्यूझीलंडविरूद्ध बांगलादेश यांच्यात खेळवला गेला. न्यूझीलंड संघाने बांगलादेशचा ६ विकेट्सने पराभव केला. पण न्यूझीलंडच्या या विजयासह पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधून बाहेर झाला. तर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अ गटातून भारत आणि न्यूझीलंड हे संघ चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलसाठी पात्र ठरले आहेत. भारत आणि न्यूझीलंडने सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत थेट सेमीफायनल गाठली आहे.




तब्बल ३० वर्षांनंतर पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळाली होती. १९९६ मध्ये झालेल्या विश्वचषकाचे यजमानपद पाकिस्तानकडे होते. त्यानंतर थेट आता २०२५ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानला मिळाले होते. पाकिस्तानने आयसीसी स्पर्धेचे यजमानपद मिळावे यासाठी बरेच प्रयत्न केले होते. पण घरच्या मैदानावर होणाऱ्या सामन्यांचा पाकिस्तानने बिलकुल फायदा करून घेतला नाही आणि पहिल्या दोन सामन्यात पराभूत होत स्पर्धेतील आपले आव्हान संपुष्टात आणले.

इतकंच नव्हे तर पाकिस्तानचा संघ २०१७ मधील चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता संघ होता, म्हणजेच या स्पर्धेतील गतविजेता संघ होता. पण पाकिस्तान आता गट सामन्यांतूनच बाहेर झाला आहे. पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ६० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. तर दुसऱ्या सामन्यात भारताकडून ६ विकेट्स आणि ४५ चेंडू राखून पराभव पत्करावा लागला होता. सलग दोन सामन्यांमधील पराभवाने आता पाकिस्तान आणि बांगलादेशचा संघ गट सामन्यांमधूनच स्पर्धेतून बाहेर झाला आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या ब गटात दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश आहे. या सर्व संघांनी आतापर्यंत १-१ सामने खेळले आहेत. ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ विजयी झाले आहेत. त्याचबरोबर इंग्लंड आणि अफगाणिस्तानला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. २५ फेब्रुवारीला ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना होणार आहे. आता कोणता संघ सलग दुसरा विजय मिळवतो यावर सर्वांचं लक्ष असणार आहे.

बांगलादेश न्यूझीलंड सामन्याची किवी संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशच्या संघाने न्यूझीलंडविरूद्ध चांगली सुरूवात करत किवींना धक्का दिला. पण न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी पुनरागमन करत बांगलादेशला बॅकफूटवर टाकले. बांगलादेशने ४५ धावांवर पहिली विकेट गमावली आणि त्यानंतर ठराविक अंतरासह संघाने विकेट्स गमावल्याचा फटका बसला. न्यूझीलंडकडून कर्णझार नझमुल शांतोने ९ चौकारांसह ७७ धावांची खेळी केली तर जाकेर अलीने ४५ धावांची आणि रिशाद हुसैनने २६ धावांची तर तन्झीद हसनने २४ धावांची खेळी करत संघाला २३६ धावांपर्यंत नेले.

न्यूझीलंडकडून मायकेल ब्रेसवेलने आपल्या फिरकीच्या जाळ्यात बांगलादेशी फलंदाजांना अडकवले आणि १० षटकांत २६ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तर विल्यम ओरूकने २ विकेट्स आणि हेन्री, जेमीसनने १-१ विकेट घेतली.

बांगलादेशने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंड संघाची सुरुवात काही खास झाली नाही. त्यांनी केवळ ७२ धावांत ३ विकेट गमावल्या. यानंतर रचिन रवींद्रने शानदार फलंदाजी करत शतक झळकावून आपल्या संघाला विजयाकडे नेले. रचिन आणि कॉन्वे यांनी मॅचविनिंग भागीदारी रचली.

---

## निवडक

### सम्राट क्लब केरीतर्फे आज चोर्ला येथे 'स्वर संध्या'


रुपेश गवस


सुशांत गावस


स्नेहल गावस

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २४ : श्री स्वयंभू रामेश्वर मंदिर चोर्ला येथे दरवर्षी प्रमाणे साजरा होणारा महाशिवरात्री उत्सव या वर्षी बुधवार दि. २६ रोजी विविध पूजा, अभिषेक अशा धार्मिक कार्यक्रमासह मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. महाशिवरात्रीच्या पूर्व संध्येला म्हणजेच मंगळवार दि. २५ रोजी संध्याकाळी ७. वाजता 'स्वर संध्या' हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचे आयोजन सम्राट क्लब केरीतर्फे करण्यात आले आहे. भक्तीगीत व नाट्यगीतांचे यावेळी सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमात गायक रुपेश गवस, सुशांत गावस व गायिका स्नेहल गावस आपली गायन कला सादर करणार आहेत. त्यांना हार्मोनियमवर भास्कर गावस, तबलासाथ विराज गावस, टाळ साथ सिद्धेश गावस करणार असून सरोजिनी गावकर कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत. कार्यक्रमासाठी सम्राट क्लब इंटरनॅशनल गोव्याचे माजी कोषाध्यक्ष व संगीत सभेचे चेअरमन प्रसाद प्रभूगांवकर प्रमूख पाहुणे म्हणून उपस्थितीत राहणार आहेत तसेच गोवा पर्यटन महामंडळाचे उपसरव्यवस्थापक दीपक नार्वेकर व गोवा विधान सभेचे संयुक्त सचिव ड.मोहन गांवकर खास मान्यवर म्हणून उपस्थित राहणार आहेत. सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन सम्राट क्लब केरीचे अध्यक्ष संजय गांवकर यांनी केले आहे.

---

### पेडणे येथे महाशिवरात्रीनिमित्त उद्या विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २४ : श्री सोमनाथ स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब नानेरवाडा, पेडणे श्री देवी भगवती, रवळनाथ देवस्थान समिती, पेडणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाशिवरात्रोत्सवानिमित्त बुधवार दि. २६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून श्री सोमनाथ देवालयात धार्मिक विधी केल्या जातील. या निमित्ताने पेडणे तालुका मर्यादित चित्रकला स्पर्धा (बारा वर्षांखालील मुलांसाठी) आणि रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. रांगोळी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. २५०१, द्वितीय रु. २२०१, तृतीय रु. १७०१, चौथे रु. १४०१, पाचवे रु. १२०१ आणि पाच उत्तेजनार्थ पारितोषिके ठेवण्यात आलेली आहेत आणि चित्रकला स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. १५०१ द्वितीय रु. १२०१, तृतीय रु. १००१ आणि दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जातील. सकाळी ११ वाजता सुप्रसिद्ध जादुगार पी. ए. सुर्यवंशी यांचे जादूचे प्रयोग होणार आहेत. दुपारी १२.३० वाजता महाआरती आणि तिर्थप्रसाद होईल. संध्याकाळी ४ वाजता गोव्यातील नामवंत भजनी कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. यामध्ये गायक म्हणून दत्तू गवस, गितेश इंफाळकर आणि लवू गवस यांचा समावेश असेल. त्यांना हार्मोनियम साथ दत्ताराम म्हामल करतील. तर तबला साथ अनुक्रमे रूपेश पंडित आणि अक्षय कांबळी करतील. त्यानंतर संध्याकाळी ८ वाजता मामा मोचेमाडकर दशावतार नाट्यमंडळ यांचा कुष्मांडा देवी महिमा हा दशावतारी नाट्यप्रयोग सादर केला जाईल. गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून लघुरूद्र आणि अन्य धार्मिक विधी व सार्वजनिक सत्यनारायण महापूजा होईल. त्यानंतर महाआरती, तीर्थप्रसाद व दुपारी एक वाजून तीस मिनिटांनी महाप्रसाद होईल. संध्याकाळी ६ वाजून तीस मिनिटांनी श्री सोमनाथ देवालयाच्या रंगमंचावर पेडणे तालुका मर्यादित भव्य वेशभूषा ( सादरीकरण वेळ फक्त दोन मिनिटे) आणि नाट्यछटा ग्रुप ड्रामा (सादरीकरण फक्त पंधरा मिनिटे) स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. वेशभूषा स्पर्धा बारा वर्षाखालील मुलांसाठी मर्यादित असून प्रथम येणाऱ्या फक्त तीस स्पर्धकांचाच स्पर्धेत समावेश करून घेण्यात येईल. वेशभूषा स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. १५०१, द्वितीय रु. १००१, तृतीय रु. ८०१, चौथे रु. ७०१, पाचवे रु. ६०१ आणि पाच उत्तेजनार्थ पारितोषिके पुरस्कृत करण्यात आलेली आहेत. नाट्यछटा (ड्रामा) स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. ४000, द्वितीय रु. ३000, तृतीय रु. २000, चौथे रु १५00 पाचवे रु. १000 अशी पाच बक्षिसे पूरस्कृत करण्यात आलेली आहेत. स्पर्धेत भाग घेण्यासाठी स्पर्धकांनी आपले ओळखपत्र आणि वयाचा दाखला आणणे अत्यावश्याक राहिल. संपर्कासाठी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे. ७९७२५२६३२९/९५६१७८००८९ आणि ७९७२९१८१६८ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

---

### बोरी येथे दत्ताराम वळवईकर स्मरणार्थ नाट्य महोत्सवाचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि. २४ : बोरी देऊळवाडा येथील श्री नवदुर्गा संस्थानाच्या सभागृहात सम्राट क्लब बोरीतर्फे आयोजित मास्टर दत्ताराम वळवईकर स्मरणार्थ नाट्य महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे श्री नवदुर्गा संस्थानाचे विद्यमान अध्यक्ष शाम प्रभुदेसाई यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून करण्यात आले.
यावेळी व्यासपीठावर बोरी गावचे सरपंच जयेश नाईक विभागीय अध्यक्ष सुबोध रामनाथकर बोरी सम्राट क्लब अध्यक्ष संतोष नाईक फोंडा सम्राट क्लब अध्यक्ष सुधीर शिंदे कार्यक्रम अधिकारी शुभदा नाईक,सचीव विनायक भेंडे व सुप्रिया पैदरकर ऊपस्थीत होते स्वागत संतोष नाईक यांनी केले या वेळी प्रमुख पाहुणे शाम प्रभुदेसाई व सुबोध रामनाथकर यांनी या.दत्ताराम वळवईकर यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण केला सदर सोहळ्यात तिशे बोरी येथील नाट्यकलाकारा व भजनी कलाकार सुनिता विश्वास नाईक यांचा सन्मान प्रमुख पाहुणे शाम प्रभुदेसाई व सरपंच जयेश नाईक यांच्या हस्ते श्री फळ,शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह प्रदान करुन सन्मानित करण्यात आले त्यांची ओळख शुभदा गुरूदास नाईक यांनी केली,या वेळी बोलताना शाम प्रभुदेसाई यांनी सम्राट क्लब बोरी ची स्तुती करुन पुढिल कामास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले,सदर सोहळ्यात मर्दिनी प्रोडक्शन चे 'घडलंय बिघडलंय' मराठी विनोदी नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला या नाटकात निखिल जोशी,वल्लभ दामले,अथर्व जोशी,,कृता जाधव, प्रविण मराठे यांनी भुमिका केल्या सदर नाटकाचे लेखन व दिग्दर्शन प्रविण मराठे यांनी केले आहे,नाट्यप्रयोगास स्थानिक नाट्य रसीकांनी उदंड प्रतिसाद देऊन कलाकारांना प्रोत्साहन दिले, शेवटी नाट्य महोत्सव अधिकारी शुभदा गुरूदास नाईक यांनी आभार मानले व्यवस्थापनाची बाजु विनायक भेंडे नितेश चव्हाण केदार पेडणेकर यांनी सांभाळले.

---

### पर्ये-सत्तरीत महाशिवत्रीनिमित्त आजपासून विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २४ : पर्ये-सत्तरी येथील श्री महादेव देवस्थानात महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला मंगळवार दि. २५ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त रात्री १०.३० वाजता खुटेश्वर नाट्य मंडळ पर्ये सत्तरीतर्फे कमलाकर बोरकर लिखित व रमाकांत केरकर दिग्दर्शित कौटुंबिक जिव्हाळ्याचे तीन अंकी सामाजिक नाटक 'सासुरवास' सादर करण्यात येणार आहे.यात सुनील माजिक, मंगेश गुरव, ज्ञानेश्वर राणे, शशिकांत सावंत, प्रशांत गोसावी, गुरुदास गावस, पांडुरंग सावंत, विशांत(पारू) गुरव व दीक्षा वेंगुर्लेकर हे कलाकार भाग घेणार आहेत. नाटकाचे संगीत दिग्दर्शक आनंद शिरोडकर, तबलासाथ जानू शिरवलकर, ध्वनीनी संकलन विशाल गावस, रंगभूषा दिलीप खरपालकर, रंगमंच प्रकाश योजना सतीश गुरव-सिया रंगमंच गुरववाडा पर्ये, निर्माता मंगेश गुरव आहेत. महाशिवरात्रीच्या पहाटे २६ रोजी देवस्थानात धार्मिक विधी, पूजा, अर्चा व अभिषेक, रात्री ८ वाजता संत फटी महाराज मठ शिरोलीतर्फे दिंडी सादरीकरण, रात्री १० वाजता भजनाचा कार्यक्रम व त्यानंतर ११.३० वाजता स्थानिक कलाकारांतर्फे 'महाकाल' हे नाटक सादर होणार आहे असे कळविण्यात आले आहे.

---

# म्हापसा ड्रीम क्रशर्सची विजयाने सांगता

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २४ : गोवा जीएसबी स्पोर्ट्स् अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने मडगावच्या एमसीसी मैदानावर आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी-२० क्रिकेट स्पर्धेत रविवारी म्हापसा ड्रीम क्रशर्सने रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजचा ९० धावांनी पराभव केला. दोन्ही संघ अंतिम चार'च्या स्पर्धेतून यापूर्वीच बाहेर पडले होते. त्यामुळे या सामन्याला फारसे महत्त्व नव्हते. दिवसातील दुसऱ्या सामन्यात प्रायॉरिटी टायटन्सने सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सला ३ गडी राखून पराभव करताना अव्वल स्थान प्राप्त केले. आता 'क्वॉलिफायर १' मध्ये देखील हेच दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत.

दिवसातील पहिल्या सामन्यात ड्रीम क्रशर्सने २० षटकांत सर्वबाद २२४ अशी विशाल धावसंख्या उभारली. यानंतर रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजने १७ षटकांत ८ बाद १३४ धावा केल्या. २३ चेंडूंत ३८ धावा केलेला राजाराम कुंडईकर या सामन्याचा मॅन ऑफ द मॅच ठरला. दुसऱ्या सामन्यात सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १३५ धावा केल्या. प्रायॉरिटीने १८ षटकांत ७ गडी गमावून १३७ धावा करत सामना जिंकला. २८ धावांत ३ बळी व १७ धावांचे योगदान दिलेला कपिल सिनाय बोरकर या सामन्याचा मॅन ऑफ द मॅच ठरला.

**प्रायॉरिटी टायटन्स अव्वल : ड्रीम क्रशर्सने रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजचा ९० धावांनी पराभव**

संक्षिप्त धावफलक - म्हापसा ड्रीम क्रशर्स - २० षटकांत सर्वबाद २२४ (राजाराम कुंडईकर ३८, नित्यय कुंकळ्येकर ३७, शैलेश महाजन ३६, व्यंकटेश वेर्लेकर २८, मेहंक धारवाडकर २२, देवकीनंदन प्रभू ३५-३, गौरीश शेणवी लोटलीकर १२-१, अनिकेत कामत १५-१, तन्मय सुखथनकर ३०-१) विजयी वि. रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज - १७ षटकांत ८ बाद १३४ (विवेक केणी ३८, गौरीश शेणवी लोटलीकर ३३, प्रशील कामत ११, महेश च्युरी १३-२, मेहंक धारवाडकर २४-१, व्यंकटेश वेर्लेकर २५-१, नित्यय कुंकळ्येकर १२-१)

सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स - २० षटकांत ९ बाद १३५ (सिद्धित रायतुरकर ३८, अच्युत नाईक दलाल २२, रौनक नारगुंडकर नाबाद १२, संदीप दलाल ११, कपिल सिनाय बोरकर २८-३, स्मितेश दिवेकर १३-३, विक्रांत प्रभू १६-१, सिद्धार्थ घाणेकर २७-१) पराभूत वि. प्रायॉरिटी टायटन्स - १८ षटकांत ७ बाद १३७ (मनीष काकोडे ३५, विक्रांत प्रभू २२, समर दुभाषी १९, कपिल सिनाय बोरकर १७, यश प्रभुगावकर २०-२, सिद्धेश प्रभू अळवेणकर ३६-१, सिद्धांत आमोणकर १७-१, संदीप दलाल २२-१).

---

# हरवळे रुद्रेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सवासाठी तयारी पूर्ण

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २४ : वार्षिक महाशिवरात्रीचा उत्सव श्री रुद्रेश्वर देवस्थान हरवळे साखळी येथे बुधवार दि. २६ रोजी साजरा करण्यात येणार असून भाविकांची मोठी गर्दी लोटणार आहे. या निमित्त तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

मंगळवार दि. २५ रोजी सकाळपासून धार्मिक कार्यक्रम, दुपारी १.३० वाजता आरती व तीर्थप्रसाद, संध्याकाळी ८.३० ते ११ पर्यंत स्थानिक कलाकारांचा भजनाचा सुरेल कार्यक्रम होईल. त्यानंतर आरती व श्रींची वाजत गाजत पालखी मिरवणूक ११.३० वाजता दशावतारी ट्रिक्सीन नाटक 'त्रिवेणी संगम' होईल.

बुधवार दि. २६ रोजी पहाटे ३ वाजता मुक्तद्वार महापर्वणीला सुरुवात होईल. पहिला अभिषेक



देवस्थानचे सचिव सुभाष नरसिंह किनळकर यांच्यातर्फे करण्यात येईल. त्यानंतर ३.३० वाजल्यापासून समस्त भाविकातर्फे श्रींच्या लिंगावर स्वहस्थे रुद्रभिषेकास सुरुवात होईल. सकाळी ७ वाजल्यापासून भविकास फराळ १२.३० वाजता महानैवेद्यास सुरवात होईल. मुक्तद्वाराचा लाभ संध्याकाळी ७.४५ पर्यंत घेता येईल. ७.४५ वाजता एक तासासाठी देऊळ साफसफाई करण्यास बंद ठेवले जाईल. ९ ते १२ स्थानिक कलाकारातर्फे भजनाचा कार्यक्रम, १२ महाआरती व वाजत गाजत पालखी मिरवणूक वरचे हरवळे येथून दिंडी पथकासह श्री केळबाई देवीचे आगमन, फडते थिएटर्स प्रस्तुत २ अंकी कोकणी नाटक

झगडयो ह्यो मोगाच्यो गुरुवार दि. २७ रोजी पहाटे ६ वाजता दिवजोत्सव तदनंतर विजयरथातुन वाजत गाजत श्रीची रथ मिरवणूक पावणी १० वाजता देवस्थानाचे मुख्यात्यार संगेश कुंडईकर यांच्या यजमान पदाने देवस्थानतर्फे अर्चशुद्धीस प्रारंभ नंतर समरतना ठीक १.४५ वाजता महाआरती, तीर्थपतासाद व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगताहोणार आहे. या उत्सवास मोठया संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन श्री रुद्रेश्वर देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

---

# मुळगाव सरकारी विद्यालयाच्या गरजू विद्यार्थिनींना सायकलचे वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २४ : सरकारी माध्यमिक विद्यालय मुळगाव डिचोली येथे कॅनरा रुबेको म्युच्युअल फंड गोवा व रोटरी क्लब पणजी यांच्या सहकार्याने गरजू विद्यार्थिनींना सायकलीचे वितरण करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. गोविंद गावस उपाध्यक्ष कॅनरा रोबेको म्युचल फंड गोवा, खास आमंत्रित म्हणून श्री. हर्षल शहा, युथ सर्विस डायरेक्टर रोटरी क्लब पणजी, विशेष आमंत्रित श्री. भालचंद्र आमोणकर डायरेक्टर कम्युनिटी सर्विस रोटरी क्लब पणजी, रोहिदास




नाईक माजी अध्यक्ष सम्राट क्लब पणजी, स्वाती आरोदेकर, मुख्याध्यापक सरकारी माध्यमिक विद्यालय मुळगाव, ज्येष्ठ शिक्षिका तेजा परब व्यासपीठावर उपस्थित होते .कार्यक्रमाची सुरुवातिला शिक्षिका तेजा परब यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, त्यानंतर मान्यवरांना विद्यार्थिनी विदिशा नागवेकर, कावेरी गावकर, श्रेया गावकर, कोमल बाजारे यांनी फुलांची रोपटे देऊन मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे संयोजक भालचंद्र आमोणकर यांनी सायकल वितरणाच्या मागचा उद्देश व हेतू स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी आपल्या मिळालेल्या सायकलीचे कसे जतन करावे व योग्य कामासाठी वापरावी याचे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक स्वाती आंरोदेकर यांनी विद्यार्थ्यानि ध्येय ठरवून मार्गक्रमण केले पाहिजे त्यासाठी विद्यालयात अनेक उपक्रम राबविले जातात, समाज उपयोगी उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळते व विद्यार्थी अभ्यासात अधिक क्षमतेने उतरतात, त्याचबरोबर त्यांनी कॅनरा रोबेको व रोटरी क्लब पणजीचे

शाळेतर्फे त्यांचे धन्यवाद मानले. गोविंद गावस बोलताना म्हणाले की, आपल्या लहानपणात सायकलचे महत्त्व खूप होते गरीबीमुळे मुलांना सायकल घेणे शक्य नसते तसेच सायकल चालवण्याने व्यायाम होतो, मुलांमध्ये तंदुरुस्ती वाढते. त्यामुळे मुलांचा अभ्यामध्ये अधिक लक्ष एकाग्रीत होते म्हणून, असे उपक्रम आपण गेल्या कित्येक वर्षे राबवत आहोत. गोव्यात जवळजवळ साडेतीन हजार सायकलची अजूनपर्यंत वितरण केले आहे, असे आपल्या भाषणातून त्यांनी स्पष्ट केले. यावेळी कार्यक्रमात पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे संयोजक शिक्षक भैरो झोरे यांनी केले.

---

# शिक्षक विकास परिषदचे संमेलन थाटात

■ टीम दैनिक हेराल्ड

शिरोडा, दि. २४ : शिक्षक विकास परिषद गोवा (राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या शिक्षकांची संघटना) तसेच ज्ञानदीप मंडळ, या संस्थांची सर्वसाधारण सभा शिरोडा येथे उत्साहात झाली. संस्था अध्यक्ष रमेश कुलकर्णी यांनी स्वागत केले. विविध थरातील पुर्व -प्राथमिक ते पोस्ट-ग्रॅज्युएट पर्यंतच्या मान्यवर शिक्षक सदस्यांच्या उत्कृष्ठ सहकार्यामुळे ज्ञानदीप मंडळ गली ५० वर्षे अविरत गोव्याच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. या मजबुत पायावर शिक्षक विकास, परिषद (राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या शिक्षकांची संघटना) गेली ३० वर्षे नियमित शैक्षणिक संमेलने, परिषदा, विविध उपक्रम गोवा, महाराष्ट्र तसेच कर्नाटकात यशस्वीपणे आयोजित करत आहे.

डॉ.वामन साळवे, पुष्पा गायतोंडे, वसंतराव महाडिक, रमेश कुलकर्णी, सूरज नाईक, रेणुका गोरल यांच्याहस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ


**शिरोडा : संस्थेचे अध्यक्ष रमेश कुलकर्णी, डॉ. वामन साळवे यांना पुष्पगुच्छ देऊन नूतन कार्यकारीणीचा पुष्प-गुच्छ देऊन सत्कार करताना. डावीकडून पांडूरंग सूतार, वसंतराव महाडिक, सातू वेळीप, सूरज नाईक व मारूती कुंभार.**

झाला. मागील सभेचा वृत्तांत, तसेच २८व्या राष्ट्रीय शैक्षणिक परिषदेचा अहवाल सेक्रेटरी पांडूरंग बखले, सेक्रेटरी सातू वेळीप यांनी वाचून दाखविला. शिक्षक विकास परिषदेचा दि. १ एप्रिल ते दि. २४ डिसेंबर पर्यंतचा ओडीट केलेला अहवाल सेक्रेटरी मारूती कुंभार यांनी सभेपुढे मांडला, त्यास सर्वानुमते मान्यता देऊन पास करण्यात. कला. संस्कृति संचालनालय गोवा यांच्या सहकार्याने या वर्षी २९वी राष्ट्रीय शैक्षणिक परिषद २०२५ नोव्हेंबर मध्ये आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच शिक्षक विकास परिषद,ज्ञानदीप मंडळ संस्थांची २०२५ ते २०३० च्या कालावधीसाठी कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

ज्ञानदीप मंडळ कार्यकारिणी २०२५ ते २०३० - अध्यक्ष-गोपाळ गुरव, उपाध्यक्ष-वसंतराव महाडिक, उपाध्यक्ष-नरसू पाटील, कार्याध्यक्ष-रमेश कुलकर्णी, सचिव-पांडूरंग बखले, खजीनदार-पद्मनाभ देसाई. सदस्य इ. सु. पन्हाळी, सूरज नाईक, प्रफुल्ला सावंत, देसाई, पांडुरंग सूतार, साईराज महाडिक, साईली महाडिक, शरद मठकर, प्रथमेश हळदणकर, देवदत्त केरकर, डॉ. संदीप प्रभूगांवकर. सचिव पांडुरंग बखलें यानी आभार मानले. भव्य थाटात समारोप समारंभाची सांगता झाली.

---




# भीमशक्ती सामाजिक संघटना राज्य नूतन समितीची निवड

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २४ : भीमशक्ती सामाजिक संघटना - गोवा राज्य कार्यकर्त्यांची धारगळ येथील सभा मंडपात अध्यक्ष ज्ञानेश्वर वारखंडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी विचार मंचावर आशा म्हापसेकर याही उपस्थित होत्या. या बैठकीत नुतन समितीची निवड करण्यात आली.

यावेळी निवडण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांची नावे - सरचिटणीस- नामदेव धारगळकर, उपाध्यक्ष-ज्ञानेश्वर म्हापसेकर, उपाध्यक्ष- गिरिश फडते, संघटक-देवानंद पालेकर, सल्लागार- एन. जे. आखरगेकर, सल्लागार-आय.एस. एल्विस गोम्स, खजिनदार- संतोष परवार, सहखजिनदार-रितेश कोरगावकर, हिशोब तपासणी-दत्तगुरु आरोसकर ही सर्व पदे निवडण्यात आली. त्यानंतर निवड झालेल्यांना पदनिहाय प्रमाणपत्रे देण्यात आली. तसेच लवकरच भीमशक्ती सामाजिक संघटना महिला कार्यकारणी निवडण्यात येईल ही कार्यकारणी महिला अध्यक्ष - जीया तोरस्कर व जनरल सेक्रेटरी - अर्चना परब यांच्या मार्गदर्शनाखाली खाली पदे निवडण्यात येतील. या बैठकीचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भीमशक्ती सामाजिक संघटनेचे सरचिटणीस नामदेव धारगळकर यांनी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 173 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .